नियमीत फौजदारी खटला क्र. **४/२०२५**
निशाणी क्र. **१४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुशांत मधुकर नाईक** |
| वय सुमारे | : | ५० वर्षे, व्यवसाय : कंत्राटदार |
| निवासस्थान | : | मु. जुना भाजी मार्केट, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

घटना दि. ०७/०८/२०२४ रोजी घडली. त्या दिवशी माझे मामे सासरे घननिळ घारु प्रधान यांचा अपघात झाला होता. सदरचा अपघात ब्राम्हण आळी येथील राम मंदीराच्या अलीकडे मेडीकल स्टोअर्स समोर झाला होता. ते मेडीकल स्टोअर्समध्ये औषध घेण्यासाठी चालले होते. मागून मोटर सायकलवरुन युवराज आला व त्याने त्यांना धडक दिली. मोटरसायकलचा क्रमांक एम् एच् ०६ ४५४५ असा होता.

०२. मी घरी होतो त्यावेळी माझ्या पत्नीचा मला फोन आला. त्यानंतर मी हॉस्पीटलमध्ये गेलो. माझे मामे सासरे मयत झालेले होते. त्यानंतर मी अपघातासंदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १५** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्षात अपघात पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जे काही सांगितले आहे ते ऐकीव माहितीच्या आधारे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मिळालेल्या माहितीप्रमाणे माझे सासरे रस्ता क्रॉस करताना अपघात झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासऱ्यांना रस्ता क्रॉस करायचा होता. हे म्हणणे खरे आहे की, मला हॉस्पीटलमध्ये अपघाताबाबत पोलीसांकडून माहिती मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या माहितीवरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये खोटा मजकूर सांगितलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **४/२०२५**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रमोद अनंत गुरव** |
| वय सुमारे | : | ५२ वर्षे, व्यवसाय : ऑडीटर |
| निवासस्थान | : | मु. गौरीनंद को. ऑप. हौ. सोसा., ता. अलिबाग |

**सरतपासणी सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत** :

दि. ०८/०८/२०२४ रोजी मला पंचनामा करण्याकरीता राम मंदीर, ब्राम्हण आळी, अलिबाग येथील जेनेरीक स्टोअर्सच्या अलीकडे अपघात झाला होता त्या ठिकाणी बोलावले होते. पोलीसांना त्या ठिकाणी पंचनामा करायचा होता. तेथे अजून दोन व्यक्ती हजर होत्या. तेथे अविनाश पाटील हे दुसरे पंच हजर होते. पोलीसांनी तेथे घटनास्थळाची पाहणी केली व त्याप्रमाणे पंचनामा तयार केला. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळाचा पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—२** म्हणजेच **निशाणी क्र. १८** देण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळाचा हातनकाशा काढला होता. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळाचा नकाशा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—३** म्हणजेच **निशाणी क्र. १९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०२. माझे ऑफीस घटनास्थळी आहे. मी मंदीराकडे जात असताना पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळावरील रस्ता हा माझा नेहमीचा असल्याने त्याची परिस्थिती मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी कोणतेही वाहन नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आज मी आल्यानंतर मला पंचनामा वाचण्यासाठी दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, जेनेरीक मेडीकल स्टोअर्सच्या इमारतीत एक जनरेटरचे शॉप आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या शॉपवर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहेत. पोलीसांनी सदरचे सी. सी.टी.व्ही. फुटेज तपासून पाहिले होते. मी ते सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहिले नव्हते.

०३. दुसरे पंच माझ्या ओळखीचे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या शेजारी नवीन इमारतीचे बांधकाम चालू आहे व तेथे पत्रे लावलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोडला फुटपाथ चालण्यासाठी नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पुढे सर्कल आहे. घटनास्थळापासून सर्कल ५० ते ६० फुट अंतरावर असू शकेल. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन काहीही जप्त केलेले नाही.

०४. घटनास्थळ मला पोलीसांनी दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, मी जाण्याआधीच पंचनामा लिहून तयार होता. घटनास्थळाचा हातनकाशा घटनास्थळीच काढला होता. हे म्हणणे खरे आहे की, नकाशामध्ये मोजमाप दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा हातनकाशा अंदाजे

काढलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा पंचनामा माझ्या समक्ष झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.		( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **११/०९/२०२५**.		मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **४/२०२५**
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **मंदार बाळकृष्ण जोशी** |
| वय सुमारे | : | ४८ वर्षे, व्यवसाय : व्यापार |
| निवासस्थान | : | मु. ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. ०७/०८/२०२४ रोजी सायं. ०४:०० वाजता घटना घडली होती. घटना माझ्या दुकानाच्या समोर ब्राम्हण आळी येथील राममंदीराच्या जवळ घडली होती. आवाज आला म्हणून आम्ही दुकानाबाहेर गेलो. तेथे एक वयस्कर इसम खाली पडला होता व बाईक खाली पडली होती. ते वयस्कर इसम बेशुद्धावस्थेत होते. ज्या मुलाची बाईक होती त्या मुलाला बाजूला बसवलेले होते. त्या मुलाला देखील लागलेले होते. चवरकर यांचे तेथे बांधकामाचे काम चालू होते ते बाहेरच उभे होते त्यामुळे ते त्या ठिकाणी धावत आले. परिस्थिती पाहता बाईकने त्या वयस्कर इसमाला धडक दिल्याचे दिसत होते. त्या मुलाला पाहिल्यास मी ओळखू शकणार नाही. माझे त्या मुलाकडे लक्ष नव्हते. ज्या इसमाला लागले होते त्या इसमाच्या औषधोपचाराकडे आम्ही पाहात होतो.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्षात घटना पाहिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दुकानासमोर बांधकाम चालू असल्यामुळे रस्त्याच्या

कडेला पत्रे लावलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथे चालण्यासाठी फुटपाथ नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला जी घटना समजली त्याप्रमाणे वयस्क इसम रस्ता क्रॉस करत होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्कींग केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे रस्ता अरुंद होतो. हे म्हणणे खरे आहे की, स्टॅंडकडून येणारा तो रस्ता आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०५/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.